# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

सिडको भवन,(दक्षिण कक्ष), बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४
दूरध्वनी : २७५७१६७३, २७५७०१६६ व २७५७८४०९
ई-मेल : ms@mjp.gov.in/ cao@mjp.gov.in


जा.क्र.मजीप्रा-२०२४/प्र.क्र.२०/बैठक-१५८/आ-४, दिनांक :- १८/०१/२०२५

प्रति,
मा.मंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री, ग्राम विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव (उर्जा) उद्योग, उर्जा कामगार विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (न.वि.२) नगर विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (व्यय) वित्त विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.

विषय : दि.११ ऑक्टोबर, २०२४ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या १५८व्या बैठकीचे इतिवृत्त.

महोदय,

दिनांक ११ ऑक्टोबर, २०२४ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या १५८व्या बैठकीचे इतिवृत्त आपल्या माहितीसाठी सोबत सादर करण्यात येत आहे.

मान्यतेने.

आपला विश्वासू,

(गजानन गुरव)
मुख्य प्रशासकीय अधिकारी

सोबत :- इतिवृत्ताची प्रत

**प्रत :** मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा अध्यक्ष, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई, यांचे माहितीसाठी.

सोबतचे इतिवृत्त मा.मंत्री, पा.पु. स्व. यांचे अवलोकनार्थ सादर करावे, ही विनंती.

प्रत: माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.

- संचालक (वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, नवी मुंबई.
- उप सचिव (पापु-२३), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
- मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, ठाणे/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजीनगर/अमरावती/नागपूर.

- अधीक्षक अभियंता (मुख्यालय), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
- अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, म.नि.सं. व सं.कक्ष, मित्तल चेंबर्स, मुंबई.
- उप अभियंता (आय.टी.सेल), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई.

सोबतचे इतिवृत्तातील आपल्या कार्यालयाशी संबंधीत कार्यक्रम बाबींवर योग्य ती कार्यवाही त्वरित करुन केलेल्या कार्यवाहीचा कार्यपुर्ती अहवाल १० दिवसांत मध्यवर्ती कार्यालयास सादर करावा.

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या १५८व्या बैठकीचे इतिवृत्त.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची १५८वी बैठक मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष, मा.श्री.गुलाबराव पाटील यांचे अध्यक्षतेखाली मा.मंत्री महोदय यांचे दालन क्र.४०२, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई येथे शुक्रवार दिनांक ११ ऑक्टोबर, २०२४ दुपारी १२.०० वाजता संपन्न झाली. या बैठकीस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाचे खालील सदस्य उपस्थित होते.

१) मा.श्री.गुलाबराव पाटील, मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे संचालक मंडळाचे पदसिध्द अध्यक्ष.

२) मा.श्री.गिरिष महाजन, मंत्री, ग्रामविकास तथा प्राधिकरणाचे संचालक मंडळाचे पदसिध्द सहअध्यक्ष.

३) श्री.संजय खंदारे, प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय मुंबई तथा प्राधिकरणाचे संचालक मंडळाचे सदस्य

४) श्री.अभिषेक कृष्णा, सदस्य सचिव म.जी.प्रा.मुंबई तथा प्राधिकरणाचे संचालक मंडळाचे सदस्य सचिव

या व्यतिरिक्त सदर बैठकीस खालील अधिकारी उपस्थित होते.

१) श्रीमती दिपाली देशपांडे-सावेडकर, मुख्य प्रशासकीय अधिकारी, म.जी.प्रा. मुंबई.

२) श्रीमती राजश्री ठोकळ, संचालक (वित्त) प्रभारी, म.जी.प्रा., सिडको भवन, नवी मुंबई.

३) श्री.अजय सिंह, अधीक्षक अभियंता (मु.), म.जी.प्रा.मुंबई.

४) श्री.प्रशांत भामरे, मुख्य अभियंता (प्र.), म.जी.प्रा.प्रादेशिक विभाग, ठाणे

सर्व प्रथम सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष, यांच्या परवानगीने बैठकीस सुरुवात करण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र. १:-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या च्या १५७व्या बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता देणे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची १५७वी बैठक दिनांक ३० सप्टेंबर, २०२४ रोजी संपन्न झाली. सदर बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता प्रदान करण्याचा प्रस्ताव संचालक मंडळास सादर करण्यात आला व त्यास मान्यता प्रदान करण्याची विनंती सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी संचालक मंडळास केली.

इतिवृत्तावर चर्चा होऊन, १५७व्या बैठकीच्या इतिवृत्तास संचालक मंडळाने मान्यता दिली.

**कार्यक्रम बाब क्र. २:-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १५७व्या बैठकीपुढील बाबींवर करण्यात आलेल्या कृतीस मान्यता देणे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची दिनांक ३० सप्टेंबर, २०२४ रोजी संपन्न झालेल्या १५७व्या बैठकीमध्ये जे निर्णय घेण्यात आले, त्या निर्णयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने केलेल्या

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

कार्यवाहीबाबत सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी संचालक मंडळास अवगत केले. त्यानुसार १५७व्या बैठकीपुढील बाबींवर करण्यात आलेल्या कार्यवाहीस मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.३ :-** पिपरी मेघे व १० गांवे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना न्यायालयीन प्रकरणाच्या अनुषंगाने तडजोडीबाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी संचालक मंडळास पुढीलप्रमाणे अवगत केले.

- **प्रकरणाची माहिती :-**

पिपरी मेघे व १० गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेच्या रू. ३०.८६ कोटी खर्चाच्या प्रस्तावास शासन निर्णय क्र. ग्रा.पा.पु. ३४०५/प्र.क्र.१०४/पा.पु.१३/ दि.२०/०७/२००५ रोजी प्रथम प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली. योजनेचे काम M/s. SMC Infra Pvt. Ltd., Thane यांना करारनामा क्र. ब-१/५, सन २००६-०७ नुसार २९.२३% जादा दराने दि.१५/११/२००६ रोजी देण्यात आले व योजनेवरील खर्चात वाढ झाल्यामुळे सुधारीत योजनेच्या रू.४०.८१ कोटी ढोबळ खर्चाच्या प्रस्तावास शासन निर्णय क्र. ग्रा.पा.पु.२९०७/प्र.क्र.१७८/पा.पु.१३/ दि.०३/०७/२००९ रोजी सुधारीत प्रशासकीय मान्यता शासनाकडून प्राप्त झाली. योजनेमधे नवीन गावांचे समावेश झाल्यामुळे योजनेवर सुधारीत योजनेच्या किंमतीपेक्षाही जास्त खर्च अपेक्षित असल्यामुळे शासनामार्फत वेळोवेळी उपस्थित केलेले मुद्दयांची पुर्तता वेळोवेळी करण्यात आली असुन अखेरची मुद्दे पुर्तता करुन दि.१९/०६/२०२४ ला रू.४१.८६ कोटी करिता पुर्नसुधारीत करुन शासनाकडे सादर करण्यात आली.

योजनेवरील २२ वे चालू देयक व २३ वे व अंतिम देयक रू.८०.७७ लक्ष अनुक्रमे सन २०११ व सन २०१३ मध्ये मंजुरीकरीता सादर करण्यात आले. सदर देयकाची अदायगी व्हावी यासाठी कंत्राटदाराने जिल्हा सत्र न्यायालय वर्धा येथे दि. २२/११/२०१८ रोजी प्रकरण क्र. ५/२०१८ दाखल केले. सदर दाव्यांतर्गत ठेकेदाराने न्यायालयामध्ये खालीलप्रमाणे एकूण रु.१,५०,५२,१७८/- इतक्या रकमेची मागणी केली होती. ठेकेदाराने न्यायालयाकडे केलेली मागणी व न्यायालयाने मान्य केल्यानुसार रकमेचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

**तक्ता क्र. १ - कंत्राटदाराचा दावा**

| अ.क्र. | विवरण | रक्कम |
|---|---|---|
| १ | १८ वे चालु बिलातुन TEO करुन वळती केलेली रक्कम | २,०२,१०७.०० |
| २ | २१ वे चालु देयकबिलातुन TEO करुन वळती केलेली रक्कम | १०,२९,२८३.०० |
| ३ | २२ वे चालु देयकाची रक्कम | ४४,२८,८०९.०० |
| ४ | २३ वे अंतिम देयकाची रक्कम | ३५,७४,८६६.०० |
| | **एकुण** | **९२,३५,०६५.००** |
| | व्याज १२% (२-८-२०१३ पासुन नोव्हेंबर-२०१८ पर्यंत) | ५८,१७,७१३.०० |
| | **एकुण दावा रक्कम :-** | **१,५०,५२,७७८.००** |

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

त्यावर जिल्हा सत्र न्यायालय, वर्धा यांनी दि.०८/११/२०२३ रोजी रू. ९२.३५ लक्ष ६% व्याजासह अदा करण्याचे आदेश दिले. **(परिशिष्ट-१)**

**तक्ता क्र. २ - जिल्हा सत्र न्यायालयाच्या निकाला प्रमाणे देय रक्कम**

| अ.क्र. | विवरण | रक्कम |
|---|---|---|
| १ | १८ वे चालु बिलातुन TEO करुन वळती केलेली रक्कम | २,०२,१०७.०० |
| २ | २१ वे चालु देयकबिलातुन TEO करुन वळती केलेली रक्कम | १०,२९,२८३.०० |
| ३ | २२ वे चालु देयकाची रक्कम | ४४,२८,८०९.०० |
| ४ | २३ वे अंतिम देयकाची रक्कम | ३५,७४,८६६.०० |
| | **मुळ मुद्दल** | **९२,३५,०६५.००** |
| | व्याज ६% नोव्हें-२०१८ ते नोव्हे-२०२४ | ३३,२४,६२३.०० |
| | **न्यायालयीन निकालाप्रमाणे देय रक्कम** | **१,२५,५९,६८८.००** |

मा. जिल्हा न्यायालय, वर्धा यांच्या आदेशाला दि. १९/०१/२०२४ रोजी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत उच्च न्यायालयाचे नागपूर खंडपीठात आव्हान देण्यात आले आहे. **(परिशिष्ट-२)**

मा. उच्च न्यायालयाने दि. २६/०८/२०२४ रोजी वसुलीपात्र रकमेपैकी ५०% रक्कम ६% व्याजासह न्यायालयात जमा करण्याचे आदेश दिले आहेत (**परिशिष्ट-३**).

खर्चात वाढ झाल्यामुळे पुर्नसुधारीत योजना शासनाकडे जुलै २०१३ पासुन मंजुरीकरीता प्रलंबित आहे. तसेच निविदेतील कलमानुसार देयकाला विलंब झाल्यास व्याज देय ठरत नाही परंतु जिल्हा सत्र न्यायालयाने प्रकरण दाखल केल्याच्या तारखापासुन व्याज देण्याचे आदेश दिले आहे. या प्रकरणी, मा. उच्च न्यायालयाने देखील ५०% मूळ मुद्दल व्याजासह जमा करण्याचे आदेश दिले आहेत. उच्च न्यायालयाने, उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाधीश श्री.एम.एन.गिलानी यांची मध्यस्थ म्हणुन नियुक्ती केली. त्यामुळे मध्यस्थासमोर सुनावणी घेऊन या प्रकरणावर तोडगा काढण्याची शक्यता तपासण्यात येत आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार रू.९२,३५,०६५/- च्या ५०% म्हणजेच रू.४६,१७,५३२/- व त्यावरील दि.२२/११/२०१८ ते दि.२२/०९/२०२४ पर्यंत ६% दराने व्याज रू.१६,१६,१२८/- असे एकुण रू.६२,३३,६६०/- न्यायालयात दि. २३/०९/२०२४ रोजी जमा करण्यात आले आहेत.

पिपरी मेघे व १० गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेतील २२वे चालू देयक व २३वे व अंतीम देयकाची एकूण रक्कम रु.८०,०३,६७५/- इतकी आहे. तसेच कंत्राटदाराच्या अंतीम देयकातुन कंत्राटदाराकडे शिल्लक असलेल्या साहित्याबाबतची कागदपत्रांची तपासणी करुन दुरुस्तीअंती रू.२.९५ लक्ष कपात करणे प्रस्तावित आहे.

सदर ठेकेदारामार्फत करण्यात येत असलेल्या नारा व २२ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेच्या कामामध्ये भाववाढ फरकापोटी ठेकेदारास रु.२१,७४,४०२/- इतकी अतिरिक्त रक्कम अदा झाल्याचे निदर्शनास

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

आल्यामुळे सदर रकमेपोटी पिपरी मेघे व १० गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेच्या कामापोटी ठेकेदारास देय असलेल्या १८ व्या व २१ व्या चालू देयकातून अनुक्रमे रु.२,०२,१०७/- व रु.१०,२९,२८३/- असे एकूण रु.१२,३१,३९०/- वसूल करण्यात आले आहेत व त्यापोटी खातेबदल आदेश (Transfer Entry Order) घेण्यात आली आहे. सदर अतिरिक्त रकमेपैकी रु.९,४३,०१२/- एवढे अद्याप वसूल करणे बाकी आहे.

सदर प्रकरणी सदस्य सचिव यांच्याकडे दि.१९.०९.२०२४ रोजी झालेल्या सुनावणीचे इतिवृत्त या कार्यालयाचे पत्र क्र. मजीप्रा/सस/तांशा-४/९१९ दि.१.१०.२०२४ अन्वये निर्गमित करण्यात आले. त्यानुसार, ठेकेदाराने त्यांनी पूर्ण केलेल्या कामापोटीचे अंतिम देयक रक्कम रु.९२.३५ लक्ष यामधून कोणतीही रक्कम वजा न करता अंतिम देयक अदा केल्यास ठेकेदारामार्फत व्याजाची मागणी केली जाणार नाही कारण सदर योजनेतील कामाच्या बाबतीत ठेकेदाराकडून वसूल करावयाच्या रक्कमेबाबत कोणत्याही सूचना/ पत्रव्यवहार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत ठेकेदाराकडे करण्यात आलेला नाही, अशी मागणी केली.

**प्रस्ताव :-**

करारनाम्याच्या अनुषंगाने सदर प्रकरणी, ठेकेदाराशी चर्चा करुन वर्धा जिल्हा न्यायालयाच्या आदेशानुसार ठेकेदाराच्या देय रक्कमेवर देय झालेल्या व्याजाचा भुर्दंड महाराष्ट्र जीवन प्राधिकरणावर पडू नये यादृष्टीने ठेकेदाराच्या मागणीचा विचार करता पुढीलप्रमाणे कार्यवाही प्रस्तावित आहे.

१. तत्कालीन सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या दि.२१.११.२०१४ रोजी पार पडलेल्या आढावा बैठकीचे इतिवृत्त या कार्यालयाचे पत्र क्र. मजीप्रा/सस/तांशा-१/११४५ दि.२.१२.२०१४ अन्वये निर्गमित करण्यात आले. त्यामध्ये "नारा योजनेचे पैसे पिपरी मेघे योजनेत अगोदरच मतभेद व गुंतागुंत असल्याने या योजनेतून वसूल न करता इतर योजनेतून वसूल करण्याचे ठरले." असा उल्लेख आहे. त्यानुसार, नारा पाणी पुरवठा योजनेच्या भाववाढ फरकापोटी ठेकेदारास अदा करण्यात आलेली रक्कम पुन:श्च नारा पाणी पुरवठा योजना अथवा ठेकेदाराच्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत सुरु असलेल्या अन्य कोणत्याही योजनेतून वसूल करण्यास ठेकेदाराने सहमती दर्शविल्यास, तत्कालीन सदस्य सचिव यांच्या निर्देशानुसार वसुलीची कार्यवाही करता येईल.

२. मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठाने दिलेल्या अंतरीम निर्णयानुसार, ठेकेदाराच्या Risk & Cost वर केलेली कामे ही दोष दायित्व कालावधी (Defect Liability Period) नंतर केली असल्याने त्याबाबतचा पत्र व्यवहार ठेकेदारास प्राप्त न झाल्याचे ठेकेदाराचे म्हणणे असल्यामुळे, तडजोड म्हणून सदर रक्कम अंदाजे रु.१३.७७ लक्ष ठेकेदाराकडून वसूल करण्यात येऊ नये.

३. ठेकेदाराकडे शिल्लक असलेल्या साहित्यापोटी, वसुल होणा-या अंदाजे रु.२.९५ लक्ष इतक्या रक्कमेबाबत, मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रादेशिक विभाग, नागपूर व संबंधित ठेकेदार यांनी संयुक्तरित्या रक्कम अंतीम करावी व सदस्य सचिव यांच्या मान्यतेनंतर, ठेकेदाराकडून वसूल करण्यात यावी.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

४. अशा प्रकारे, उपरोक्त मुद्दा क्र.१ ते ३ मधील ठेकेदारास अदा करावयाची एकूण रक्कम अंतीम करावी. तथापि, ही योजना पुर्नसुधारीत करुन (किंमत रू.४१.८६ कोटी) शासनाकडे मंजूरीसाठी सादर करण्यात आली आहे. सदर पुर्नसुधारीत योजनेस शासनाची मान्यता मिळाल्यानंतर सदर रक्कम ठेकेदारास अदा करावी.

५. त्या बदल्यात, ठेकेदाराने कोणत्याही व्याजाची मागणी करु नये व मा.उच्च न्यायालयामार्फत नियुक्त केलेल्या मध्यस्थासमोर मध्यस्थीद्वारे या प्रकरणी तडजोड करावी.

वरीलप्रमाणे पिपरी मेघे व १० गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेच्या न्यायालयीन प्रकरणाच्या अनुषंगाने, ठेकेदारासोबत तडजोड करणे विषयीच्या कार्यक्रम बाबीवर मा.संचालक मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा झाली व पुढीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :-**

असा ठराव पारित करण्यात येतो की, निविदा करारनाम्याच्या अनुषंगाने सदर प्रकरणी, ठेकेदाराशी चर्चा करुन वर्धा जिल्हा न्यायालयाच्या आदेशानुसार ठेकेदाराच्या देय रक्कमेवरील व्याजाचा भुर्दंड महाराष्ट्र जीवन प्राधिकरणावर पडू नये यादृष्टीने या प्रकरणी ठेकेदारासमवेत पुढीलप्रमाणे तडजोडीची कार्यवाही करावी.

१. तत्कालीन सदस्य सचिव, मजीप्रा यांच्या दि.२१.११.२०१४ रोजी पार पडलेल्या आढावा बैठकीचे इतिवृत्त मध्यवर्ती कार्यालयाचे पत्र क्र. मजीप्रा/सस/तांशा-१/११४५ दि.२.१२.२०१४ अन्वये निर्गमित करण्यात आले. त्यामध्ये "नारा योजनेचे पैसे पिपरी मेघे योजनेत अगोदरच मतभेद व गुंतागुंत असल्याने या योजनेतून वसूल न करता इतर योजनेतून वसूल करण्याचे ठरले." असा उल्लेख आहे. त्यानुसार, नारा पाणी पुरवठा योजनेच्या भाववाढ फरकापोटी ठेकेदारास अदा करण्यात आलेली रक्कम पुन:श्च नारा पाणी पुरवठा योजना अथवा ठेकेदाराच्या मजीप्रामार्फत सुरु असलेल्या अन्य कोणत्याही योजनेतून वसूल करण्यास ठेकेदाराने सहमती दर्शविल्यास, तत्कालीन सदस्य सचिव यांच्या निर्देशानुसार वसुलीची कार्यवाही करता येईल.

२. मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठाने दिलेल्या अंतरीम निर्णयानुसार, ठेकेदाराच्या Risk & Cost वर केलेली कामे ही दोष दायित्व कालावधी (Defect Liability Period) नंतर केली असल्याने त्याबाबतचा पत्र व्यवहार ठेकेदारास प्राप्त न झाल्याचे ठेकेदाराचे म्हणणे असल्यामुळे व त्या बाबीस क्षेत्रीय कार्यालयाने होकार दर्शविल्याने, तडजोड म्हणून सदर रक्कम अंदाजे रु.१३.७७ लक्ष ठेकेदाराकडून वसूल करण्यात येऊ नये.

३. ठेकेदाराकडे शिल्लक असलेल्या साहित्यापोटी, वसुल होणा-या अंदाजे रु.२.९५ लक्ष इतक्या रक्कमेबाबत, मुख्य अभियंता, म.जी.प्रा., नागपूर व संबंधित ठेकेदार यांनी संयुक्तरित्या रक्कम अंतीम करावी व सदस्य सचिव यांच्या मान्यतेनंतर, ठेकेदाराकडून वसूल करण्यात यावी.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

४. अशा प्रकारे, उपरोक्त मुद्दा क्र.१ ते ३ मधील ठेकेदारास अदा करावयाची एकूण रक्कम अंतीम करावी. तथापि, ही योजना पुर्नसुधारीत करुन (किंमत रू.४१.८६ कोटी) शासनाकडे मंजूरीसाठी सादर करण्यात आली आहे. सदर पुर्नसुधारीत योजनेस शासनाची मान्यता अद्याप अप्राप्त आहे. त्यामुळे, सदर रक्कम रु.९२.३५ लक्ष पर्यंत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या स्वनिधीतून ठेकेदारास अदा करण्यासाठी तात्पुरत्या स्वरूपात उपलब्ध करुन देण्यात यावेत. पुर्नसुधारीत योजनेस शासनाची मान्यता मिळाल्यानंतर अथवा याप्रकरणी शासनाचे निर्देश प्राप्त झाल्यानंतर सदर रक्कम म.जी.प्रा.च्या स्वनिधीत वळती करण्याची जबाबदारी मुख्य अभियंता तसेच संबंधित कार्यकारी अभियंता यांची राहील.

५. वरील सर्व बाबींचा विचार करून मुख्य अभियंता यांनी सदर प्रकरणाची तपासणी करून वसूल करावयाची रक्कम अंतिम करावी. व याबाबत मुख्य अभियंता कार्यालयाने अभिलेखी ठेवावे.

६. त्याचप्रमाणे, ठेकेदाराने देय रकमेवरील व्याजाची मागणी करु नये व मा.उच्च न्यायालयामार्फत नियुक्त केलेल्या मध्यस्थासमोर मध्यस्थीद्वारे या प्रकरणी तडजोड करावी.

वरीलप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.४ :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या नागरी, ग्रामीण पाणी पुरवठा योजना, डोंगराळ/पर्यटन क्षेत्रातील पाणी पुरवठा योजना व पेरी अर्बन योजनामधून होणाऱ्या पाणी पुरवठयाचे सुधारीत दर लागू करणेबाबत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या नागरी, ग्रामीण पाणी पुरवठा योजना, डोंगराळ/पर्यटन क्षेत्रातील पाणी पुरवठा योजना व पेरी अर्बन योजनामधून होणाऱ्या पाणी पुरवठयाचे सुधारीत दर लागू करणेबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त कार्यक्रम बाब पुढे ढकलण्यात (Defered) आली.

**आयत्या वेळेची कार्यक्रम बाब क्र.१ :-**

**विषय :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निविदा समितीने घेतलेल्या निविदा स्विकृतीच्या/अस्विकृतीच्या निर्णयांवर शिक्कामोर्तब करणेबाबत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निविदा समितीच्या १७१ व्या बैठकीमध्ये निविदा स्विकृती/ अस्विकृतीच्या घेतलेल्या निर्णयांवर मा.संचालक मंडळाने शिक्कामोर्तब करण्याविषयीच्या कार्यक्रम बाबीवर मा.संचालक मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा झाली व पुढीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :-**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मा.निविदा समितीच्या १७१व्या बैठकीमध्ये निविदा स्विकृती/अस्विकृतीच्या घेतलेल्या निर्णयांवर मा.संचालक मंडळामार्फत शिक्कामोर्तब करण्यात येत असून या १७१ व्या निविदा समितीच्या बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयांना मान्यता देण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**आयत्या वेळेची कार्यक्रम बाब क्र.२ :-**

**विषय :** केंद्र शासन पुरस्कृत अमृत-२.० कार्यक्रमांतर्गत अंबरनाथ नगरपरिषद नळ पाणी पुरवठा योजना ता.अंबरनाथ जि.ठाणे, योजनेवर होणाऱ्या अपेक्षित वाढीव खर्चास मंजूरी मिळणेबाबत.

सदरील कार्यक्रमबाब पुढे ढकलण्यात (Deferred) आली.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा. पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.